म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. ५९२६
REFBK-0002464

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. नं. ५२६

# [illegible]पाहवाची जबाबदारी.

लेखक

वसंत पुरुषोत्तम पौडवाल, बी. ए.

मुद्रक व प्रकाशक
पांडुरंग नारायण जव्हेरी विनय प्रेस, प्रफुल्लता कचेरी,
नवरोजी स्ट्रीट, ठाकुरद्वार–मुंबई २.

संन्यासः कर्मयोगश्च निश्रेयसकरावुभौ ।
तयोस्तु कर्मसंन्यासात्कर्मयोगो विशिष्यते ॥

—भगवद्गीता.

# विवाह व विवाहितांची जबाबदारी.

REFBK-0002464

नाना वेष नाना आश्रम । सर्वांचें मूळ गृहस्थाश्रम ।
जेथें पावती विश्राम । त्रैलोक्यवासी ॥

—समर्थ रामदास.

२८४८

लेखक
वसंत पुरुषोत्तम पौडवाल, बी. ए.

[ सन १९२४. ]

सर्व

विवाहेच्छूंस व विवाहितांस

कर्त्यानें

प्रेमानें व आदरानें

अर्पण

केलें आहे.

# दोन शब्द

"आपुलिया बळें नाहीं मी बोलत ।
सखा कृपावंत वाचा त्याचा ॥"

" विवाह व विवाहितांची जबाबदारी " हा लेख " प्रफुल्ला " ह्या करमणुकपर व ज्ञानप्रद साप्ताहिकांतून क्रमशः प्रसिद्ध केला होता व तो आतां प्रकाशकांच्या कृपेमुळें पुस्तक रूपानें वाचकांच्या हातीं देण्याचा सुप्रसंग येत आहे, ही आनंदाची गोष्ट होय. याबद्दल प्रकाशकांचे जितके आभार मानावे तितके थोडेच आहेत.

या लेखांतील विषय सर्वांना उपयुक्त व महत्वाचा वाटेल असाच आहे. संसाराविषयीं विरक्त बनून व ब्रह्मचर्य किंवा संन्यास दीक्षा घेऊन इतरांनाहि त्याच मार्गाकडे वळविणाऱ्या शंकराचार्यांचा किंवा बुद्धाचा काल इतिहासाच्या अंतर्पटांत केवळ स्मृतिशेष होऊन राहिला आहे. तो काळ हल्लीं पुनरुज्जीवित होईल असा फारसा संभव नाहीं. हरीभाऊंच्या " मी " कादंबरींतील भावानंदाच्या मठाची व्याप्ति व समाप्ति त्या कादंबरींतच झालेली आहे. दृश्य सृष्टींत तसे ब्रह्मचारी समाजसेवकांचे मठ स्थापन झालेले दिसून येत नाहींत. वासुदेवराव आपट्यांच्या " दुःखा अंती सुख " या कादंबरीमध्यें सदुबापुचे ब्रह्मचारी राहून समाजसुधारणा करण्यासंबंधीं विचार आठव्या प्रकरणांत त्याच्या मृत्युबरोबर विराम पावले आहेत. त्या कादंबरींत दुसऱ्या कोणत्याहि पात्रानें सदुबापुचे विचार कृतींत आणलेले दिसत नाहींत. एकंदरींत आजन्म ब्रह्मचारी व संन्यासी राहणें हें साधारणतः मनुष्य स्वभावाविरुद्ध आहे असें ह्मणावें लागतें. अर्थातच सर्व माणसें विवाहेच्छु व विवाहित याच एका सदरांत समाविष्ट होतात. त्यांत जर कोणी अपवाद होत असतील तर ते अपवाद ह्मणून त्याचा विचार करावयाचा नाहीं.

या विषयासंबंधीं विचार जागृति होऊन अधिक चांगलीं पुस्तकें निघावीं या हेतुनें मी माझ्या अल्पमतीप्रमाणें आपले विचार मांडले आहेत. त्यांत कोठेंहि मतभेदास जागा ठेवलेली नाहीं. हल्लीं सर्व लोकांमध्यें स्त्रीशिक्षणा-

संबंधीं आवड उत्पन्न झाली आहे. यामुळें तत्संबंधीं या लेखामध्यें आलेले विचार सर्वांसच पटतील असा भरंवसा वाटतो.

या अल्पकृतींत कांहीं दोष राहिले असल्यास त्याबद्दल वाचक उदार मनानें क्षमा करतील अशी आशा आहे.

लेडी जमशेदजी रोड
दादर–मुंबई
ता० १६।६।२४

सर्वांचा नम्र,
**वसंत पुरुषोत्तम पौडवाल.**

# शुद्धपत्र.

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| १ | १ | त्रिवाहहितांची | विवाहितांची |
| ,, | २ | मार्म | मार्ग |
| ४ | ४ | सततीस | संततीस |
| ६ | ४ | दुसन्सा | दुसऱ्या |
| ,, | १६ | महात्वाचा | महत्वाचा |
| ,, | २४ | झाला | आला |
| ७ | १५ | श्रुत्यथ | श्रुत्यर्थ व स्मृत्यर्थ |
| १० | २ | सद्ध | सिद्ध |
| १२ | ४ | So | To |
| ,, | १० | Inspitation | Inspiration |
| १४ | १ | लेकॅा | लेकी |
| ,, | १६ | परपरांच्या | परस्परांच्या |
| १५ | ११ | स्वयोगिति | स्वयोषिति |
| १८ | २० | संबंध | संबद्ध |
| २१ | १२ | विवाहाशानें | विवाहानें |
| २७ | २३ | fecl | feel |
| २८ | ३ | Contemplation | the Contemplation |
| ,, | २५ | होत. असे | होत असे. |
| ३० | ४ | संख्थेच्या | संख्येच्या |

# विवाह व विवाहितांची जबाबदारी.

मानवी जीविताचा हेतु आत्मोन्नति हा आहे. आत्मोन्नतीचे तीन मार्ग आहेत:—कर्म, ज्ञान आणि उपासना. पैकीं पहिला मार्ग सर्वांत श्रेष्ठ आहे. श्रीमद्भगवतगीतेंत कर्ममार्गाचें श्रेष्ठत्व प्रतिपादलें आहे. या ग्रंथांत वेदोपनिषदांचें सार आलें आहे अशी समजूत आहे व ती खोटी नाहीं. यावरून गीतेचें प्रतिपादन व सिद्धांत यांस किती महत्व आहे हें कळून येईल. कर्ममार्ग श्रेष्ठ कां, हा निराळा विषय आहे. त्याचें विवरण येथें विस्तारानें करतां येणें शक्य नाहीं. सर्व प्राणिमात्रांना कर्म करावें लागतें. " न हि कश्चित् क्षणमपि जातु तिष्ठत्यकर्मकृत् " कर्मांवांचून प्राणिमात्रांचा क्षणहि जात नाहीं. " मार्गांत मनुष्यांना देह धारणेचीं कर्में इतर प्राण्यांप्रमाणें करावीं लागून विवा· विशेष कर्तव्यें—जबाबदारीचीं कामें—करावयाचीं असतात. तीं विधिपूर्वक यथासांग केल्यानें मनुष्यांची आत्मोन्नति होते.

परमेश्वरानें जगांत स्त्री व पुरुष निर्माण केले आहेत. त्यांत त्याचा हेतु परस्परांनीं सहकार्य करून आत्मोन्नति करावी असा आहे. स्त्री व पुरुष यांनीं एकात्मभावानें राहून आपल्या एकच असलेल्या आत्म्याची उन्नति करून घ्यावी ही परमेश्वरी योजना अतिशय चातुर्याची आहे. सुलभ रीतीनें जिच्यावरून चढून जातां येईल अशी आत्मज्ञानाची ती पहिली पायरी आहे. ज्ञानमार्गांत पुष्कळ प्रगति होईपर्यंत ती पहिली पायरी सुद्धां अदृश्य असते.

कर्ममार्गांतील जबाबदारीचीं कामें पार पाडण्यास स्त्रीपुरुषांचें परस्परांवर अत्यंत प्रेम असणें जरूर आहे. त्याशिवाय त्यांचा संसार सुखकर होणार नाहीं. उत्कट प्रेम हें उपासनेचें बीज आहे. तें स्त्रीपुरुषांच्या मनांत पेरलें गेल्याशिवाय कर्ममार्ग सफळ होणार नाहीं हें उघड आहे.

कर्ममार्गांतच ज्ञानमार्ग व उपासनामार्ग यांचीं बीजें असल्याचें दिसून येतें. यावरून कर्ममार्ग हा इतर मार्गांहून श्रेष्ठ आहे असें जें वर म्हटलें आहे

तें युक्तच होय. कर्ममार्गांत निराळ्या मार्गांचीं जीं बीजें दिसून येतात त्यांची जोपासना व वाढ करणें हें आत्मोन्नतीसाठीं खटपट करणाऱ्या मुमुक्षूचें कर्तव्य आहे.

विवाह शब्दांत वि+वह हा धातु आहे. त्याचा अर्थ विशेष हेतूनें बरोबर घेणें असा होतो. स्वधर्माचरणासाठीं–स्वोन्नतीसाठीं–परस्परांचें सहचरण–स्नेह–होणें याचेंच नांव विवाह होय. विवाहानें प्रजेचा विस्तार होतो म्हणून विवाहित स्थितीला प्रपंच किंवा संसार म्हणतात. वर्णाश्रमांना योग्य अशीं कृत्यें करण्यासाठीं–कर्ममार्ग आचरण्यासाठीं–स्त्रीपुरुषांनीं विवाह करावा असें हिंदुधर्म-शास्त्रांत म्हटलें आहे. विवाह हा एका आश्रमांतून दुसऱ्या आश्रमांत जाण्याचा दरवाजा आहे. पहिल्या आश्रमांत पूर्ण ब्रह्मचर्यव्रताचें आच-रण ठेवून ज्ञान व बल वाढविलें पाहिजे, नंतर गुण, कर्म व स्वभाव समान
१ ल्या स्त्री-पुरुषांनीं परस्परांशीं प्रेमबद्ध व विवाहबद्ध होऊन संसार
” जावृद्धि ) करावा अशी शास्त्राज्ञा आहे.
४

६ स्त्री व पुरुष हीं एका मानवजातीचीं दोन अंगें आहेत. तीं नीतिमान राहूनच त्यांच्या आकांक्षा सफल झाल्या पाहिजेत. त्यांना संसार सरळपणें करतां येऊन सामाजिक व धार्मिक कर्तव्यें करतां यावी म्हणून त्यांचा विवाह होणें जरूर आहे, असें पाश्चात्य ग्रंथकारांनीं लिहिलें आहे. हा विवाह व्यवहार व शास्त्र यांच्या अनुरोधानें होईल तरच मनुष्याला त्याच्या वृद्धावस्थेपर्यंत गृहसुख मिळेल. विवाह झाल्यानंतर स्त्रीपुरुषांना खरें स्वातंत्र्य प्राप्त व्हावयाचें असतें. तें प्राप्त न होतां त्याकरितां स्त्रीपुरुषांना घटस्फोट करावा लागला तर त्यांचा विवाह झालाच नाहीं असें समजलें पाहिजे विवाह हा मुदतबंदीचा करार नाहीं किंवा तो स्त्रीनें आपलें नांव बदलूनहि होत नाहीं. "Intellectual Life" या ग्रंथांत खऱ्या विवाहाचें खालीलप्रमाणें वर्णन दिलें आहे.

"Real marriage is a long slow inter growth, like that of two trees planted quite close together in a forest."

( अरण्यांत अगदीं एकमेकांशेजारीं लावलेल्या दोन वृक्षांचा जसा परस्पर विकास बहुतकाळ मंदप्रमाणानें होतो तसाच तो खऱ्या विवाहाचा होत असतो.)

कालिदासानें आपल्या "शाकुंतल" नाटकांत शकुंतलेच्या विवाहविषयक विचारांचा परिपोष वरील प्रकारानेंच केला आहे. तपावनांतील सहकार वृक्ष अगदीं वरपर्यंत माधवी लतेनें वेष्टिलेला स्निग्ध दृष्टीनें पाहून शकुंतलेनें आपल्या विवाहाचा आदर्श ठरविला आहे. यावरून स्त्रियांनीं पुरुषांच्या बरोबरीनें उच्च स्थिति—उन्नत स्थिति—प्राप्त करून घ्यावी हें विवाहाचें ध्येय पूर्वकाळीं मानलें जात असे हें सिद्ध होतें. स्त्रीपुरुषांचें सहकारित्व हेंच विवाहाचें उत्तम लक्षण आहे व या दृष्टीनेच विवाहविधीचें महत्व आहे. एका कवीनें ह्मटलें आहे:—

"संसाररूप शकटाप्रति वाहणारीं । चक्रेंच दोन असतां नर आणि नारी ॥
त्यांमास कीं सहचरत्व तया द्वयास । आहे विवाह विधि हा जणूं एक आंस ॥"

विवाहविधीचें महत्व आद्यावस्थेंतील समाजास कळणें शक्य नसतें. विवाहाची कल्पना सुद्धां त्या स्थितींत त्यास नसते. कोणत्याहि समाजाची आद्य स्थिति पशूंसारखी असत. स्त्रीपुरुषांत अनियमित व्यवहार घडून शिशुसंवर्धनाची जबाबदारी स्त्रीवर्गावरच पडते. पुरुषवर्ग त्या जबाबदारीपासून अगदीं अलिप्त राहून कोणत्याहि प्रकारें स्त्रीवर्गास साहाय्य होत नाहीं. अशा असाहाय्य स्थितींत शिशुसंवर्धनाची जबाबदारी व उदरनिर्वाहाची विवंचना यांनीं त्रासून स्त्रियांकडून भ्रूणहत्त्या होते व त्यांचा सुद्धां अकालींच अंत होतो. असे अनेक दुष्परिणाम पुरुषांच्या नजरेस येऊन त्यांना स्त्रियांसंबंधीं आपले कर्तव्याची जाणीव होते. ते स्त्रियांशीं आपला संबंध बराच काळ ठेवतात व शक्त्यनुसार त्यांचें इतर पुरुषांपासून रक्षण करतात. या व्यवस्थेपासून स्त्रियांचे स्थितींत विशेष अशी सुधारणा होत नाहीं. स्त्रीपुरुषांचे अनियमित व्यवहार चालू राहतात व त्यांपासून वर सांगितलेले दुष्परिणाम उद्भवतात. दुष्काळांत हे दुष्परिणाम अधिक तीव्र होत असतात. स्त्रियांची संख्या फारच कमी होऊं लागते. अशा स्थितींत अनेक पुरुषांना एका स्त्रीशीं संबंध ठेवावा लागतो. त्याचा परिणाम अर्थातच वाईट होतो. वाईटांतून कधीं कधीं चांगलें

निष्पन्न होतें असें ह्मणतात. त्याच न्यायानें या स्थितींतून कुटुंब व्यवस्था अस्तित्वांत येत असते. या स्थितींतून कुटुंब व्यवस्था कशी उत्पन्न होते यासंबंधीं शास्त्रज्ञांत दोन मतें आहेत. सर जॉन लबक यांच्या ह्मणण्याप्रमाणें एका स्त्रीशीं अनेक पुरुषांचा संबंध होत असल्यामुळें तिच्या संततीस जे वारस हक्क प्राप्त होतात त्यांचा उपभोग स्त्रियांनाच घ्यावयास मिळतो. अशा रीतीनें समाजांतील सर्व मिळकत स्त्रियांकडे जात असल्यामुळें पुरुषांना ती मिळविण्याकरितां स्त्रियांचा अपहार करण्याची बुद्धि होते एका जातींतील पुरुष आपल्या जातींतील स्त्रीला दुसऱ्या जातींतील पुरुषांनीं हिरावून नेऊं नये ह्मणून खबरदारी घेतात. जातींतील पुढाऱ्यांची स्त्रियांवर मालकी राहत. व अशा प्रकारें एका जातींतील मिळकत त्याच जातींत राहून ती पुढाऱ्याच्या मालकीची होते. या जाती फार मोठ्या नसतात. एकापेक्षां अधिक वंशांची एक जात होऊं शकते व त्यांच्या मालकीची बहुधा एकच स्त्री असते कांहीं पुरुष, त्यांची मिळकत व एक स्त्री हीच पूर्वींची कुटुंब व्यवस्था होय

हर्बर्ट् स्पेन्सर प्रभृति इतर शास्त्रज्ञांना कुटुंब व्यवस्थेच्या मुळाशीं वारस हक्कासंबंधीं प्रश्न असतो, हें तत्व मान्य नाहीं. त्यांना समाजाच्या आद्यावस्थेंत पुरुषांमध्यें वारस हक्कासंबंधीं जाणीव उत्पन्न होत असेल असें वाटत नाहीं. " बळी तो कान पिळी " या तत्वानुसार जाती जातींत सदोदित जीवनार्थकलह चालला असतांना मिळकतीच्या हक्कांकडे पुरुषांना लक्ष देण्यास फुरसत सांपडली असेल, हें त्यांना संभवनीय वाटत नाहीं. त्या काळीं जातीच बळ वाढविण्याकडे पुरुषांचें सर्व लक्ष वेधलें होतें. जातींत संख्याबल व एकीचें बळ वाढविणें हाच पुरुषांचा मुख्य व्यवसाय होता. त्याच्या अनुरोधानें प्रथम जातीसंस्था व नंतर कुटुंबसंस्था अस्तित्वांत आल्या, असें हें दुसरें मत आहे. तें ग्राह्य समजून एकपत्नीव्रताची चाल कशी अस्तित्वांत आली याची उपपत्ती लावतां येते. जातींत संख्याबल वाढविणें हा एक कुटुंबसंस्थेचा हेतु असून तो सफल होण्यास एकपत्नीव्रताचा चांगला उपयोग होतो, असे नजरेस आल्यावरून तें व्रत किंवा ती चाल समाजांत प्रूढ झाली असावी. एकपत्नी व्रतानें समाजांत अधिक प्रजावृद्धि होते, हें तत्व शास्त्रसिद्ध आहे पूर्वकाळीं

श्री ग्रं

शास्त्राची वाढ झाली नव्हती; तथापि वरील तत्व व्यवहारावरून लोकांना सहज समजण्यासारखें होतें.

एकपत्नीव्रताची चाल प्रचारांत येऊन कुटुंबव्यवस्थेंत स्थैर्य आलें. स्त्रियांची जमा मिळकतींत व दासदासींत न होतां योग्यतेनुरूप समाजांत त्यांचा सन्मान होऊं लागला. पाश्चात्य राष्ट्रांत Chivalry ( स्त्रीदाक्षिण्य ) या संस्थेनें व आपणांकडील प्राचीन ऋषीमुनींनीं स्त्रियांची वैयक्तिक योग्यता प्रस्थापित करण्याचे बाबतींत बरीच कामगिरी केली. अशाप्रकारें समाजांत प्रगति होत असतांना विवाह संस्था अस्तित्वांत आली. तिला विशिष्ट प्रकारच्या विधीनें स्थाईक स्वरूप मिळालें व सुधारलेल्या काळांत विवाहविधीनें स्त्रीपुरुष एकजीव होतात ही कल्पना समाजांत दृढमूल झाली.

कोणताहि समाज आद्यस्थितींतून सुधारलेल्या स्थितींत पायरी पायरीनें येत असतो. एकदम त्याची सुधारणा होत नाहीं; किंवा मूळचाच तो सुधारलेला असूं शकत नाहीं. पाश्चात्य शास्त्रज्ञांनीं परिश्रम करून समाजाच्या आद्यावस्थेपासून सुधारलेल्या स्थितीपर्यंत क्रमवार ज्या पायऱ्या लावल्या आहेत, त्यावरून आमचाहि समाज चढून आला आहे; ही गोष्ट इतिहास मानलेल्या महाभारत ग्रंथावरून स्पष्ट दिसून येते. ती कबूल केल्यानें स्वाभिमानाला कमीपणा येत नाहीं, किंवा पूर्वजांची कीर्ति त्यामुळें मलीन होत नाहीं. महाभारत हा ग्रंथ कौरव पांडवामध्ये १८ दिवस झालेला युद्धाचा इतिहास म्हणून प्रथम लिहिण्यांत आला. " जयेतिहास " असें त्या ग्रंथाचें पहिलें नांव होतें, पुढें त्यांत बऱ्याच काळचा इतिहास संग्रहांत केल्यापासून त्यास " भारत " व " महाभारत " अशी नांवें क्रमानें प्राप्त झालीं. महाभारत हा व्यास प्रभृति ऋषींनीं लिहिलेला भारतकाळचा इतिहास आहे. त्यांत त्या काळच्या चालीरीती, नीति कल्पना, समाज व्यवस्था वगैरे बरीच माहिती दिलेली आहे. आद्यावस्थेंतील समाजाची कल्पना येण्यास या ग्रंथाचा उपयोग होण्यासारखा आहे. एकंदर ग्रंथावरून समाज सुधारणेच्या पंथांत होता व त्यानें आद्यावस्थेतून सुधारणेचा मार्ग आक्रमिला होता असें दिसतें. अनियमित स्त्री पुरुष संबंध होऊन नंतर नियमित स्त्रीपुरुष संबंधाची कल्पना समाजांत प्रचलीत

...... फूळ नदाच्या मूळाप्रमाणें अज्ञात असे. व्यासाचा जन्म अनियमित स्त्रीपुरुष संबंधापासून झाला असल्याचें सिद्ध आहे. कुटुंब व्यवस्थेंत हल्लीं प्रमाणें सुधारणा झाली नव्हती. एक बंधु मरण पावल्यावर त्याच्या स्त्रीशीं दुसऱ्या बंधूस संबंध ठेवतां येत असे. एका स्त्रीनें अनेक पती करण्याची चाल समाजांत रूढ होती. द्रौपदीचे विवाहसमयीं धौम्य ऋषींनीं द्रुपद राजाला दिव्यज्ञान—इतिहास ज्ञान—दिलें त्यावरून अनेक पती करण्याची चाल पूर्वी सार्वत्रिक होती असें कळतें. स्त्रियांनीं एका पतीबरोबर विवाह करावा व पतिव्रता धर्मानें—विवाहित पतीशीं इमानानें—वागावें असा नियम दीर्घतमा ऋषीनें केला. तो अंध असल्यामुळें त्याची स्त्री प्रद्वेषी त्यास सोडून स्वैर वर्तन करूं लागली; यामुळें त्यानें स्त्रियांसंबंधीं वरील निर्बंध केला. विवाहाला शुद्ध स्वरूप व पावित्र्य देण्याचें कार्य श्वेतकेतूनें केलें. कोणाहि अन्य पुरुषानें विवाहित स्त्रीशीं संबंध ठेऊं नये व स्त्रीपुरुषाचा विवाह पवित्र मानण्यांत यावा असा धार्मिक विधि—कायदा— त्यानें प्रचारांत आणला. त्यानें आर्यावर्तांत जें कार्य केलें तसेंच इजिप्तमध्यें मेन्स, चीन देशामध्यें फोहि व ग्रीस देशामध्यें सिक्रॉप्स यांनीहि केलें असल्याचें इतिहासावरून समजतें.

सर्व सामाजिक प्रश्नांमध्यें अतिशय नाजूक व महात्वाचा असा जर कोणता विषय असेल तर तो विवाहासंबंधींच होय. विवाह संस्थेच्या पवित्रपणावर एकंदर समाजाची स्थिरता व शुचिता अवलंबून असते. ज्या समाजांतील विवाह संस्था निर्दोष असते त्याच समाजांत सुशिक्षण व शील यांची वाढ होते. विवाह संस्थेचें असें महत्व असल्यामुळें ती धार्मिक बाब ह्मणून समजली जाते व तिचे कांहीं विवक्षित धार्मिक विधि आखण्यांत आलेले असतात. लोकांची संस्कृति व धर्मभेद यांना अनुसरून अनेकविध विधि व तसेच कायदेहि निर्माण होत असतात. इहलोकीं सुखानें संसार करतां येऊन परमार्थाचें ध्येय सुलभ रीतीनें साध्य व्हावें ह्मणून हिंदु-विवाह-विधि प्रचारांत आला. समाजांत नीतिमत्ता राहण्यासाठीं विवाहाची आवश्यकता आहे, हें जाणून त्याचा धर्मांत अंतर्भाव करण्यांत आला हें ठीकच झालें. पाश्चात्य राष्ट्रांत विवाहाला थोडेंसें करारांचें स्वरूप देण्यांत येतें; तथापि तेथेंहि विवाहासंबंधीं ......

सचा कायदा प्रमाण मानण्यांत येतो व विवाह चर्चमध्यें परमेश्वराला साक्षी ठेवून करण्यांत येतो.

आज आपण विवाहासंबंधीं जितका धार्मिक विधि करतो तितका पूर्वकाळीं करीत नसत. वेदकाळांत विवाहाचे वेळीं फक्त होमविधि करीत. वेद ब्राह्मणादि ग्रंथानंतर " गृह्यसूत्र " नांवाचे ग्रंथ झाले; त्यांत गृहधर्म सांगितले आहेत. ते विवाहानंतर गृहस्थांनीं व गृहिणींनी पाळावयाचे असत. गृह्यसूत्रे निरनिराळीं आहेत. त्यानंतर अनेक स्मृति झाल्या. त्यांत देशाचाराप्रमाणें व लोकव्यवहाराप्रमाणें निरनिराळे आचार व नियम विधिनिषेधयुक्त म्हणजे कायद्याच्या स्वरूपांत सांगितले आहेत. स्मृतीकारांचा स्मृति लिहिण्यांत मूळ उद्देश श्रुतींना अनुसरण्याचा होता. या मूळ उद्देशाप्रमाणें स्मृति लिहिल्या गेल्या असत्या तर त्यांत एकसूत्रीपणा किंवा एकवाक्यता राहिली असती. पण निरनिराळया काळांतील शिष्टजनमताला व आचाराला कायद्याचें स्वरूप देण्यापलिकडे स्मृतीकारांनीं अधिक कामगिरी केली नाहीं. वेळोवेळीं स्मृतिकारांनीं आचार विचाराच्या क्षेत्रांच्या मर्यादा बदलल्यामुळें त्यांत विसंगति उत्पन्न झाली. श्रुत्यर्थ तर बराच भानगडीचा झाला. वेदकालीन विवाह–संस्कारांतील उद्देश स्मृतींनीं अगदीं बदलून टाकला. पुढील काळांत—हा काळ अलिकडील ५०० वर्षांचा आहे—प्रयोग ग्रंथ निर्माण झाले. त्यांनीं पूर्वीच्या सर्व ग्रंथांतून तडजोड करून संस्कार, मत्र वगैरे संकलीत केले. पण या काळांतील पुरोहित वर्ग अज्ञान बनल्यामुळें त्या संस्काराचा व मंत्रांचा अर्थ समजल्याशिवाय विवाह होऊं लागले. तेव्हांपासून विधि व रूढी यांचा भेसळ होऊन रूढीचें प्राबल्य माजलें, तें इतकें कीं, वधुवरांची विवाहसमयीं वयोमर्यादा अमुकच असावी असा निर्बंधहि घालण्यांत आला. त्यांना विवाह कर्तव्य आहे किंवा नाहीं हें न पाहतां विवाहाची सक्ति त्यांजवर लादण्यांत आली. आणि विवाह म्हणजे समाजांतील एक आवश्यक समारंभ होऊन राहिला. विवाहांतील जे मंत्र वधुवरांनीं म्हणावयाचे असतात ते हल्लीं ब्राह्मण म्हणतात. पण पूर्वी ते वधुवरें स्वतां म्हणत असून त्यांचा अर्थ कळण्याइतकें त्यांचें प्रौढ वय व ज्ञान असे. त्यांच्या इच्छेनें विवाह घडून येत

असत. स्त्रियांच्या बाबतींत स्वयंवराची चाल असून त्यांना त्यांच्या इच्छेविरुद्ध विवाह करण्याची पाळी कधींहि येत नसे.

विवाहाचे आठ प्रकार सांगितले आहेत. त्यांत ब्राह्मविवाह पद्धत सर्वांत श्रेष्ठ असून तीच हल्लीं प्रचलीत आहे. या पद्धतीप्रमाणें वाग्दान, सप्तपदी व होम हे मुख्य विधि असून पायधुणी, मंगलाष्टकें, मधुपर्क वगैरे अनुषंगिक विधि आहेत. याशिवाय कांहीं रूढ चालींना सुद्धां विधींचें स्वरूप आलें आहे. देशाचारानुसार निरनिराळया चाली रूढ झाल्या असल्यामुळें त्यांचा विचार विस्तारभयास्तव येथें करतां येत नाहीं.

वाग्दान विधि वधुवरांचा विवाह निश्चित झाल्यावर त्यांच्या वडिलांकडून वाचेनें अथवा प्रतिज्ञा लेखानें उपाध्याय करवून घेतो. हा विधि शास्त्रयुक्त झाल्यावर विशेष कारणानें वधुवरांचा विवाह होणें अशक्य झाल्याखेरीज तो मोडतां येत नाहीं. विवाह संस्थेंत यामुळें स्थैर्य येऊन तत्संबंधीं लोकांत सद्भावना व सुविचार यांची वाढ होते.

वर वधुगृहीं आल्यावर पायधुणीचा जो विधि होतो त्यांतील मंत्र वराला उपदेशपर असतात ब्रह्मचर्यानंतर जे राष्ट्रकार्य करावयाचें त्याची जाणीव या वेळीं वराला करून देतात त्याकडे व विवाहाच्या पावित्र्याकडे त्याचें दुर्लक्ष होऊं नये म्हणून सावधानसूचक मंगलाष्टकें म्हणतात. तीं म्हणण्याचा प्रघात अलिकडील काळांत पडला आहे. विवाहसंबंधीं जबाबदारी ओळखून वरानें आपला संसार सुखानें करावा यासाठीं मधुपर्क विधि करतात. मध ज्याप्रमाणें गोड असतें त्याप्रमाणें वरानें आपला संसार गोड करावा असें त्याला मधुपर्क-दान करून लक्षणेनें सुचविण्यांत येतें.

संसार अथवा प्रजावृद्धि करण्याकरितां स्त्री पुरुषांनीं परस्परांच्या लज्जेचा होम करावा. लाजेला तिलांजली द्यावी–ती सोडून द्यावी–हें सुचविण्याकरितां लाजाहोम करावयाचा असतो, असा कित्येकांचा समज आहे. विवाह होम अथवा लाजा ( लाह्या ) होम करतात तेव्हां वधुवरांनीं अग्नीसमक्ष परस्परांचें अभिष्ट चिंतून संसारांत एकमेकांना साहाय्य करावें अशीं आश्वासनें द्यावयाचीं

असतात. वेदकाळीं विवाहाचा हा एकच मुख्य विधि असे हें वर एकदां सांगण्यांत आलें आहे.

सप्तपदी झाल्याशिवाय विवाह पूर्ण होत नाहीं. ती झाल्यानंतर वधुवरांचें नातें जडतें. तें परस्पर मित्रत्वाचें असतें. तदनुसार. पुढीलप्रमाणें कर्तव्यें करणें त्यांना प्राप्त होतें.

( १ ) परस्परांना अनुकूल असें आचरण ठेवणें.

( २ ) स्त्रीनें पाकनिष्पत्ति करणें, त्याकरितां लागणारें साहित्य पुरुषानें पुरविणें व दोघांनींहि आपले नैतिक बल वाढविणें.

( ३ ) संपत्ति मिळवून अतिथींचा सत्कार करणें.

( ४ ) परस्परांच्या सुखाकरितां अहर्निश झटणें.

( ५ ) प्रजावृद्धि करणें.

( ६ ) वडील मंडळींची सेवा करणें.

( ७ ) धर्म, अर्थ, काम व मोक्ष साध्य करून परस्परांची उन्नति करणें.

" धर्मे, अर्थे कामेच नातिचरामि " ही विवाहांतील अत्यंत महत्वाची शपथ आहे. वरील कर्तव्यांची जाणीव प्रत्येक पाऊल उचलतांना वधुवरांना व्हावी म्हणून तसे मंत्र त्यांजकडून म्हणवून घेतात. अशा प्रकारें सात पावलें बरोबर चालून वधुवरांचें सख्य होतें व विवाह पूर्ण होतो.

" सखा सप्तपदी भव " हा सप्तपदीमधील शेवटचा मंत्र आहे. तसेंच कन्यादानाचे वेळीं वरानें वधूशीं स्नेहाचें वर्तन ठेवावें असा मंत्र म्हणण्यांत येतो. यावरून विवाहविधीनें स्त्रीपुरुषांचा दर्जा व अधिकार समसमान ठेवला आहे असें स्पष्ट होतें. दुसरी एक गोष्ट आपल्या विवाहविधीवरून स्पष्ट होते ती ही की, विवाहाच्या वेळीं वधुवरांचीं वयें सज्ञान स्थितींतील असलीं पाहिजेत. म्हणजे विवाहविधींत ज्या प्रतिज्ञा करावयाच्या असतात त्यांचा अर्थ कळण्याइतकें त्यांचें ज्ञान व वय असलें पाहिजे. बालवयांत विवाहाची जबाबदारी कळणें शक्य नाहीं. अर्थातच बालविवाह हे निषिद्ध होत. श्रुतींनी वधुवरांची

जी विवाहमर्यादा ठरविली आहे त्यावरून सुद्धां बालविवाह निषिद्ध आहेत हें सद्ध होतें.

भारतवर्षाच्या अवनतावस्थेचीं जीं अनेक कारणें आहेत त्यापैकीं बालविवाहाची चाल हें एक प्रमुख कारण आहे. प्राचीन काळीं आर्यावर्तातील लोक ब्रह्मचर्यव्रताचे योग्य पालन करीत असल्यामुळें त्यांना शारिरीक, मानसिक व नैतिक बल प्राप्त होऊन गहन विचाराचीं व थोर पराक्रमाचीं कामें करतां येत असत. पुरुषार्थाचीं कामें करतां येण्याला जें सामर्थ्य लागतें तें ब्रह्मचर्य व्रतानेंच प्राप्त होण्यासारखें असतें ही गोष्ट आपल्या पूर्वजांना चांगली कळली होती. प्राचीन ग्रंथांतून ब्रह्मचर्याचें महत्व वर्णन करण्यांत आलें आहे तें याच कारणावरून होय. ब्रह्मचर्य हें एक प्रकारचें सात्विक तप आहे. व हें तप पुरें करण्याचें काम अलिकडील पिढ्यांकडून नीट रीतीनें होत नसल्यामुळें त्यांची अवनति होत आहे. पुढील पिढीच्या उन्नतीचा पाया ब्रह्मचर्यव्रतावरच अवलंबून आहे हें ओळखून जर सध्यांची पिढी ब्रह्मचर्यव्रतानुसार वर्तणार नाहीं तर पिढ्यानुपिढ्या होणारी ही अवनति कधींच थांबणार नाहीं व त्याचा अंतीं काय परिणाम होईल तो नजरेसमोर येण्याला त्याचें हिडीस चित्र येथें रेखाटलेंच पाहिजे असें नाहीं.

ब्रह्मचर्यांतून गृहस्थाश्रमांत पाऊल टाकल्यावर पहिल्या व्रताची सांगता झाली, पुढील आश्रमांत त्या व्रतासंबंधीं कांहींच कर्तव्यें राहिलीं नाहींत अशी समजूत करून घेतल्यास ती चुकीची होईल. ज्याची बॅचेलर ऑफ् आर्टस्‌ची परिक्षा उतरली आहे त्याचे अभ्यासास तेव्हांपासून खरी सुरवात होते. ती परिक्षा पास होऊन सर्व अभ्यास पुरा होत नाहीं हें जितकें खरें आहे तितकेंच ब्रह्मचर्यव्रत पाळण्याचा योग्य काळ गृहस्थाश्रमच होय हेंहि खरेंच आहे. ब्रह्मचर्यव्रताचें नियम व त्यासंबंधीं आवश्यक कर्तव्यें गृहस्थाश्रमांतच पाळतां आलीं पाहिजेत; व तशी तीं पाळतां येणें हें राष्ट्रांतील भावी प्रजेच्या हिताच्या दृष्टीनें आवश्यक आहे. जे लोक विषयांधतेनें निसर्ग नियमांना झुगारून स्वैर वर्तन करण्यास उद्युक्त होतात व आपल्या इंद्रियांना दाबांत ठेवीत नाहींत

त्यांचा गृहस्थाश्रम कधींच सुखाचा होत नाहीं. त्यांच्या विषयांधतेच्या दुष्परिणामापासून जी अशक्त व व्याधिग्रस्त प्रजा निपजते तिची काळजी घेण्यांत त्यांचा सर्व काळ जाऊं लागतो. त्यांच्या स्वताच्या शरीराची व संपत्तीची धूळधाण होऊं लागते व स्वगृहांनच अर्भकांचे–मुलांचे–जननमरणाचे फेरे वारंवार येऊं लागल्यामुळें संसाराची असारता त्यांना जाणवते. पण विषयांधतेमुळें त्यांची संसाराची आसक्ति अखेरपर्यंत कमी होत नाहीं. सुदृढ, सद्गुणी, निकोप प्रकृतीचीं, सौंदर्यानें व बुद्धीनें तेजस्वी दिसणारीं अशीं थोडीं मुलें ज्या घरांत असतात तेंच घर आनंदाचें साम्राज्य होऊं शकतें. असें हें आनंदाचें साम्राज्य बनविण्याचें सामर्थ्य फक्त ब्रह्मचर्यव्रतनिष्ठ गृहस्थाश्रमी स्त्रीपुरुषांचेंच असतें. म्हणून ब्रह्मचर्यव्रताची उपेक्षा केल्यास गृहस्थाश्रमांत कधींच सुख मिळणार नाहीं हा प्रमाणभूत सिद्धांत गृहस्थाश्रमी स्त्रीपुरुषांनीं स्मरणांत अक्षय्य ठेविला पाहिजे.

विवाहांतील सुमनांच्या मालांना सुवर्णाच्या सर्व अलंकारापेक्षां अधिक महत्व असतें. तें कळण्याला वधुवरांनीं सुविद्य होऊन एकमेकांना आपलें हृदय अर्पण करण्याची तयारी करावी लागते.

" सुवर्णाच्या भूषा जरि तव शिरीं या विलसती।
तरी या माल्याचें अणुभर न त्या काम करिती ॥ "

असें केशवसुतांनीं " प्रियेला सादर केलेली पुष्पमाला " या कवितेंत जें वर्णन केलें आहे तेंच सध्यांच्या काळीं विवाहमालेसंबंधीं अन्वर्थक आहे. विवाहसंबंधीं जबाबदारी कळण्याइतकी वधूची विद्या झालेली नसते. अर्थातच त्याप्रमाणें वागण्याची वधूच्या मनाची तयारी होत नाहीं, हें निराळें सांगावयास नको. वधुवरांकडील वडील माणसें वधुवरांची मनें परस्परांशीं जुळतील किंवा नाहीं याकडे मुळींच लक्ष देत नाहींत. ती धन व दागिने यासंबंधीं करार करण्यांत मात्र आपलें पूर्ण लक्ष ठेवतात. विवाहानंतर वधुवरांचीं मनें परस्परांस अनुकूल राहतील असा त्यांना भरंवसा वाटतो.

समाजाच्या भीतीमुळें किंवा स्वताच्या हौसेखातर मुलामुलींच्या शरीराची वाढ पूर्ण झाली नाहीं तेव्हांच त्यांचे विवाह उरकून घेणारी वडील मंडळी

विवाह जुळवितांना मुलामुलींचा विचार घेत नाहींत यांत नवल नाहीं. वडील मंडळी आपल्या मुलामुलींच्या विवाहाची गांठ एका दिवसांत घालून देतात पण ती मुलामुलींची जन्माची गांठ पडते. डॉ. स्टॉल या ग्रंथकारानें आपल्या " What a young man ought so know " या ग्रंथांत ह्मटलें आहे कीं,

" Remember that marriage is not for a day or year; not simply for the period of prosperity but for life, for the time of adversity, when in the darkness you will need somebody to stand by you, that each may be to the other an inspiration, a help and a stay."

" ध्यानांत ठेवा कीं, विवाह हा एका दिवसापुरता, एका वर्षापुरता किंवा केवळ चालत्या काळापुरता नसून तो सार्‍या आयुष्याकरितां व विपत्काळांतील अंधःकारांत एकमेकांजवळ राहून एकमेकांना आश्रय, साहाय्य व उत्साह देण्याकरितां असतो. " हा उपदेश ग्रंथकारानें तरुण मंडळीसच केला आहे तरी आपल्या समाजांतील वडील मंडळींनीं सुद्धां आपल्या मुलामुलींचे विवाह जुळवितांना त्या उपदेशाचें सार ध्यानांत ठेवणें आवश्यक आहे.

पतिव्रत आणि पत्नीव्रत ह्मणजे काय याची जाणीव विवाहविधि करुन देत असतो. स्त्रीनें पतिव्रत पाळणें व पुरुषानीं पत्नीव्रत पाळणें व दोघांनींहि निग्रहि, सत्कर्मशील व शांतचित्त राहून संसार करणें या संबंधीं विवाहविधींत आज्ञा केल्या असून त्या प्रतिज्ञापूर्वक पाळण्याच्या शपथा वधुवरांनीं घेतलेल्या असतात. अर्थात् त्याप्रमाणें वागण्याची जबाबदारी विवाहितांवर पडते. स्त्रीपुरुषांनीं स्वधर्मानुसार प्राप्त होणारे गुण व कर्मे यांचें आचरण करावें, दुर्व्यसनापासून अलिप्त राहावें; व आपला संसार सुखकर करावा यासाठीं विवाहविधीची योजना आहे.

" नाना उदात्त गुण आणि उदार कर्मे ।
साधोनि, आचरोनि उन्नत नीति धर्मे ॥

सायुज्यता निजगृही मिळवावयाला ।
हा दिव्य लग्नविधि बंध निर्मियेला ॥ " —चंद्रशेखर.

विवाहविधि झाल्यावर स्त्रीपुरुष दुसऱ्या आश्रमांत प्रवेश करतात. आश्रम हें पवित्र स्थळ आहे, त्यांत अपवित्र आचरण ठेवणें अनुचित आहे, ही जाणीव सतत राहावी म्हणून विशेष प्रकारची योग्यता ज्यांत आवश्यक आहे अशा आयुष्यक्रमाला आश्रम ही संज्ञा दिली आहे. हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें आश्रम चार आहेत. त्यापैकीं दुसऱ्या आश्रमाला गृहस्थाश्रम हें नांव देतात. गृहाखेरीज गृहस्थ असू शकत नाहीं व गृहस्थाश्रमहि होत नाहीं. तद्वतच गृहिणीखेरीज गृह असणें शक्य नाहीं. " न गृहं गृहमिति आहुः गृहिणी तु गृहमुच्यते " अशाप्रकारचा गृहिणी, गृह, गृहस्थ व गृहस्थाश्रम यांचा अन्योन्य संबंध आहे. हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें पतिपत्नीसंबंध व गृह्याग्निसिद्धि या दोन गोष्टी गृहस्थाश्रमाच्या द्योतक आहेत. स्त्रीपुरुषांनीं सन्मार्गगामी असावें म्हणून गृहस्थाश्रम स्वीकारलाच पाहिजे असा प्राचीन ऋषींचा कटाक्ष आहे.

" अनाश्रमी न तिष्ठेत दिनमेकमपि द्विजः ।
आश्रमेण विना तिष्ठन्न प्रायश्चित्तायते हि सः ।
अविप्लुत ब्रम्हचर्यो लक्षण्यां स्त्रीयमुद्वहेत्त । "

गृहस्थाश्रम स्वीकारतांना स्त्रीपुरुषांचें जें स्थित्यंतर होतें तें महत्वाचें असतें. त्यामुळें त्यांजवरील जबाबदारी वाढून त्यांना आपली बुद्धि स्थिर ठेवावी लागते. पुरुषांच्या स्वभावांत सौम्यपणा, स्नेह, विनय, दया हे मनाचें विकार दिसूं लागतात. स्वार्थबुद्धि मागें पडून परोपकार करण्याची प्रवृत्ति विकास पावते. स्त्रियांच्या स्वभावांत मर्यादशीलपणा, वात्सल्य, सहनशीलता इत्यादि मनोविकार विशेष वाढून गृहिणीपदाचीं कर्तव्यें करण्याची त्यांची उत्सुकता वाढते. गृहस्थाश्रमांत स्त्रीपुरुषांची योग्यता सारखी असली पाहिजे. विषम योग्यतेचे स्त्रीपुरुष विवाहानें बद्ध झाले तर गृहस्थाश्रम सुखाचा होणार नाहीं. तसेंच गृहस्थाश्रमांत स्त्रीनें अथवा पुरुषानें परस्परांच्या योग्यतेसंबंधीं विष-

मता दर्शविली तर सुखापेक्षां दुःखच त्यांच्या अनुभवास अधिक येईल. लेकी या पाश्चात्य विद्वानानें " Map of Life " या ग्रंथांत गृहस्थाश्रमांतील स्त्रीपुरुषांच्या योग्यतेविषयी खालीलप्रमाणे लिहिलें आहे.

"Woman is not a mere weaker man; and the happiest marriages are often those in which in tastes, character and intellectual qualities, the wife is rather the compliment of man—the reflection of her husband.''

"स्त्री म्हणजे केवळ शक्तिहीन पुरुष नव्हे; आणि जेव्हा आवड स्वभाव व बुद्धिविषयक गुणांचे बाबतींत स्त्री ही पतीची पूर्णता करणारी—पूरणिका—किंबहुना प्रतिमा असते तेव्हां त्या पतीपत्नीचा संसार सुखावह होतो." आपणांकडील प्राचीन वाङ्मयांत स्त्रीला अर्धांगी म्हटलें आहे. " अर्धं भार्या मनुष्यस्य " स्त्री व पुरुष एक असून त्यांत स्त्रीचें अर्धें अंग आहे म्हणजे स्त्रीची योग्यता पुरुषाच्या बरोबरच आहे. विधियुक्त विवाहानें होणारा स्त्रीपुरुषांचा संबंध त्यांच्या आयुष्याच्या अखेरपर्यंत राहतो. कशीहि परिस्थिति येवो त्यांतून स्त्रीपुरुषांनीं आपलीं विवाहबंधनें शिथील होऊं न देतां परपरांच्या साहाय्यानें पार पडलें पाहिजे. करारानें झालेलीं विवाहबंधनें शिथील होण्याचा संभव असतो. इहलोकीचें ध्येय व परलोकीचें श्रेय प्राप्त होण्याकरितां विधियुक्त विवाहाचें व गृहस्थाश्रमाचें अत्यंत महत्व आहे.

विवाह ही संस्था परमेश्वर निर्मित आहे असें केवळ जरी म्हणतां येणार नाहीं, तरी ती ईश्वरी शक्तिच्या प्रेरणें मुळेंच अस्तित्वांत आली आहे यांत संशय नाहीं. विवाह संस्था जर नसेल तर समाजांत नीतिमत्ता राहणार नाहीं, भावी प्रजेची जोपासना व वाढ जशी व्हावयास पाहिजे तशी होणार नाहीं. विवाहसंस्थेमुळें स्त्री पुरुषांचा जो संबंध जडतो तो अत्यंत पवित्र आहे. त्यांत मंगलमय रहस्य आहे, स्त्रीपुरुषांनीं धर्मानुसार वर्तन करावें याचसाठीं विवाह संस्था अस्तित्वांत आली आहे. या संस्थेचा मूळ व अंतीम हेतू धर्मानुसार .

हाच एक आहे. स्वतःचें तसेंच समाजाचे हितासाठीं स्त्रीपुरुषांनीं धर्माचरण करणें आवश्यक आहे, याची जाणीव निरंतर राहावी ह्मणून विवाह संस्थेची व तदनुषंगिक विधींची योजना करण्यांत आली आहे. स्वर्गलोक जर कोठें असेल तर तो इहलोकीच आहे जेथें सर्वदा धर्मानुसार वर्तन घडतें तेथें सुखाचा अक्षय्य वास होतो. या अक्षय्य सुखाचीं वसतिस्थानें जीं कुटुंबें त्यांनाच भूतळावरील स्वर्ग असें म्हणण्यांत येतें व तें बरोबरहि आहे. शुद्ध धर्मानुसार वर्तणारीं व परस्परांच्या हिताविषयीं आस्था बाळगणारीं कुटुंबेंच सुखाच्या परमावधीस पोंचतात—किंबहुना आनंदाचीं साम्राज्यें बनतात.

एका कवीनें म्हटलें आहे:—

सानंदं सदनं सुताश्च सुधियः कांता सुधाभाषिणी ।
सन्मित्रं सधनं स्वयोषिति रतिश्चाज्ञापराःसेवका ॥
आतिथ्यं शिवपूजनं प्रतिदिने मिष्टान्नपानं गृहे ।
साधो संगमुपासतेहि सततं धन्यो गृहस्थाश्रमः ॥

असा हा गृहस्थाश्रम धन्य व्हावयाला मूळ कारण विधियुक्त विवाहच होय

विवाहानंतर स्त्रीपुरुषांना कांहीं सामान्य व कांहीं विशेष कर्तव्यें करावीं लागतात. गृहस्थाश्रमांत स्त्रीपुरुषांनीं स्वतांचा योगक्षेम नीटरीतीनें चालवून परोपकार कृत्यें करावींत; किंबहुना स्वतांचा संसार सुरळीत चालला आहे एवढ्यांतच सुख न मानतां परोपकार दृष्टीनें आपल्या इतर बंधुभगिनींकडे पाहाणें हें विवाहित स्त्रीपुरुषांचें कर्तव्य आहे. "Charity begins at home" असें जें म्हटलें आहे, त्याचा अर्थ असाच आहे. परोपकाराला घरीं सुरुवात करून देशकार्य, राष्ट्रकार्य वगैरे महत्वाच्या कामांत शक्त्यनुसार हातभार लावणें हें प्रत्येक स्त्रीपुरुषाचें कर्तव्य आहे. नीतिदृष्ट्या यालाच जबाबदारी असें म्हणतात. " प्रपंच साधुनी परमार्थाचा लाभ ज्यानें केला तो नर भला रे भला " असें शिवदिनकेसरी कवीनें म्हटलें आहे. रामदास, तुकाराम इ० महंतांचीं अशींच कित्येक वचनें प्रसिद्ध आहेत. तीं धर्मप्रवण म्हणजे धर्माकडे प्रवृत्ति करणारीं आहेत. प्रपंच साधून परमार्थाकडे चित्त ठेवावें हाच त्यांचा तत्वतः बोध आहे.

सामान्यजन आपल्या आयुष्याचा सर्व उपयोग प्रपंच नीटनेटका करण्याकडे करीत असतात. प्रपंचाव्यतिरिक्त इतर गोष्टींकडे त्यांचें क्वचितच लक्ष जातें, स्टीव्हन्सन नामक ग्रथकार ह्मणतो:—

"But marriage if comfortable, is not at all heroic. It certainly narrows and damps the spirits of generous men. In marriage a man becomes slack and selfish and undergoes faulty degeneration of his moral being."

"विवाहापासून मनुष्यांना सुख होत असलें तरी त्यामुळें त्याची कर्तृत्व शक्ति मुळींच वाढत नाहीं. यद्यपि तो मनुष्य उदारबुद्धीचा असला तथापि सुद्धां त्याच्या उत्साहांत विवाहामुळें शिथिलता व आकुंचितपणाच येतो. त्याच्या उत्साहास ओहटी लागते, स्वार्थास भरती चढते व एका प्रकारें त्याची नैतिक अवनतीहि होते."

विवाहाचा हेतु मनुष्याची नैतिक अवनति व्हावी असा असणें कदापिहि शक्य नाहीं. स्वकर्तव्यरत राहून स्त्रीपुरुषांनीं परस्परांची उन्नति करावी याच-साठीं विवाह करावयाचा असतो अधःपतन टाळून उन्नत स्थिति प्राप्त व्हावी या करितांच स्त्रीपुरुषांना विवाहाचा सोपान मार्ग चढून जावयाचें असतें. हा मार्ग सहजासहजी चढून जाण्यासारखा नसतो. त्या मार्गावरून जात असतांना स्त्रीपुरुषांना त्यांच्या स्वतःसंबंधीं बंधुजनासंबंधीं आणि सर्व लोकांसंबंधीं कांहीं विवक्षित कर्तव्यें करावीं लागतात. स्टीव्हन्सननें ह्मटलें आहे कीं, "marriage like life...is a field of battle and not a bed of roses" (आयुष्याप्रमाणें विवाह ही सुद्धां एक रणभूमि आहे, ती गुलाब पुष्पांची शय्या नाहीं.)

गृहस्थाश्रम सर्व आश्रमांत श्रेष्ठ आहे. याचें कारण कोणत्याहि आश्रमापेक्षां त्यांत परोपकार कृत्यें अधिक करतां येतात. तसेंच त्यापासून दुसऱ्या आश्र-

मांनाहि साहाय्य होत असतें. भिक्षेकऱ्याला भिक्षा देणें, मधुकऱ्याला मधुकरी देणें, ब्राम्हणाला दक्षिणा देणें वगैरे गोष्टी परोपकारांत येतात. याशिवाय पुष्कळ गोष्टी परोपकारांत येऊं शकतील इतकें त्याचें क्षेत्र मोठें आहे. सामान्य माणसाला वरील विशेष गोष्टी तेवढयाच परोपकाराच्या दिसतात. रुग्णसेवा, समाजसेवा, राष्ट्रसेवा, धार्मिक जागृतीचें कार्य, न्यायदानाचें कार्य इ० अनेक महत्वाचीं कामें परोपकारांत येत असून त्यासंबंधीं पुष्कळांना जाणीव नसते. प्रवृत्त्यात्मक आणि निवृत्त्यात्मक असे परोपकार कृत्यांचे दोन भाग करून त्यांचें विवेचन हर्बर्ट् स्पेन्सर यानें आपल्या "Benevolence" ग्रंथांत केलें आहे. त्याचेंच प्रो. धोंडो केशव कर्वे यानीं केलेलें "परोपकार" हें भाषांतर आहे. यापैकीं कोणतेंहि पुस्तक वाचलें असतां परोपकाराची चांगली कल्पना करतां येणार आहे.

परोपकार जितका कठीण आहे तितका सोपाहि आहे. "परउपकार एका वचनाचाहि फार" हें संत वचन सुप्रसिद्ध आहे. आपल्या एका शब्दानें परोपकार होऊं शकतो ही गोष्ट गृहस्थाश्रमी स्त्रीपुरुषांनीं ध्यानांत ठेवण्यासारखी आहे.

> "तृणानि भूमिरुदकं वाक् चतुर्थीच सुनृता ।
> एतान्यपि सतां गेहे नोच्छिद्यंते कदाचन ॥"

कोणी अतिथि आला असतां त्याला बसावयास गवताचे आसन ( चटई ) निदान जमीन तरी, पोटभर पाणी, व आदराचे गोड शब्द यांना भल्यामाणसाच्या घरीं केव्हांहि वाण नसते अतिथींचा सत्कार करणें हा गृहधर्म आहे. महाभारत शांतिपर्वांत कपोत पक्षानें जसा गृहधर्म पाळला तोच आदर्श दृष्टीपुढें ठवून गृहस्थांनीं व गृहिणींनीं स्वधर्म—गृहधर्म—आचरावा. गृहधर्मांत समाजसेवा व राष्ट्रसेवा यांचें बीज आहे आत्मोन्नति किंवा पुरुषार्थ साधावयास विवाहितांना प्रथम याच पायरीवरून जावयाचें असतें. यावरून त्याचें महत्व व तत्संबंधीं विवाहितांवर असलेली जबाबदारी किती आहे हें कळून येईल.

गृहस्थाश्रमांत परस्पर उपकाराचें मोठें महत्व आहे, हे विवाहित स्त्रीपुरुषांनीं

ध्यानांत ठेविलें पाहिजे. या लेखाच्या पूर्वभागांत स्त्रियांच्या बाबतींत पुरुषांचें प्रथमपासून कसें अन्याय्य वर्तन होत असतें हें दाखविलें आहे. अजूनहि पुरुषांना आपल्या बळाच्या जोरावर स्त्रियांच्या आचारविचारांवर सत्ता गाजवितां येऊन आपले आचार विचार स्वच्छंदी ठेवतां येतात .यामुळें स्त्रियांना आपले जबाबदारीची जाणीव होत नाहीं, व पुरुषांना ती होऊन सुद्धां तदनुसार आपलें वर्तन ठेवण्याची बुद्धि होत नाहीं. याचा परिणाम भावी पिढीवर अत्यंत अनिष्ट होतो. ही स्थिति सुधारण्याला स्त्रियांच्या बाबतींत होत असलेला अन्याय दूर झाला पाहिजे. परोपकाराचें मुळाशीं जसें न्याय तसेंच प्रेम हें दुसरें तत्व आहे. विवाहित आयुष्यक्रम सुखावह होणें ही गोष्ट विवाहित स्त्रीपुरुषांनीं परस्परांवर निर्व्याज व निर्हेतुक प्रेम करण्यावर अवलंबून आहे. स्त्रियांच्या अशा प्रेमाची पुरुषांना अत्यंत गरज असते.

एकंदरींत " Give and take is evidently the golden rule for successful matrimony " विवाह सुखावह होण्याला स्त्रीपुरुषांनीं खऱ्या भावानें—देवाण-घेवाण या तत्वाचा अवलंब केला पाहिजे. " Virginibus Puerisque " या पुस्तकांत स्टीव्हन्सननें म्हटलें आहे कीं, " To dwell happily together they should be-versed in the niceties of the heart and born with a faculty of willing compromise. "

" संसारांत सुख व्हावें याकरितां स्त्रीपुरुषांचीं मनें सुसंपन्न असावीत व त्यांची प्रवृत्ति परस्पराशी स्नेह संबंध होण्यास स्वभावतः अनुकूल असावी. "

मनूनें एके ठिकाणी म्हटलें आहे.

तथा नित्यं यतेयातां स्त्री पुंसौ तु कृतक्रियौ ।
यथा नाभिचरेतां तौ वियुक्ताविनरेतरम् ॥

परस्परांमध्यें विरोध येऊं नये असें विवाहित स्त्रीपुरुषांनीं आचरण ठेवलें पाहिजे. तसें आचरण ठेवावयाचें तर स्त्रीपुरुषांमध्यें परस्पर प्रेम असणें जरूरीचें आहे.

विवाहित स्त्रीपुरुषांनीं परस्पराबद्दल आदर ठेवला पाहिजे. त्यांनीं शांततेनें व प्रेमानें राहिलें पाहिजे. " जायापत्ये मधुमतीं वाचं वदतु शान्तिवान् " विवाहित स्त्रीपुरुषांनी शांत राहून मधूर भाषण करावें असा प्राचीन ऋषींनीं आज्ञा केला आहे; कलह करणें किंवा पाश्चात्य राष्ट्रांत Divorce करतात त्या प्रकार करणें त्यांना मुळींच संमत नाहीं. अथर्ववेदांत कलहामुळें स्त्रीपुरुषांतील स्वाभाविक तेज नाहींसें होतें असें सांगितलें आहे.

" यथा सूर्यो नक्षत्राणामुद्यंस्तेजस्यादद्दे
तथैव स्त्रीणांच पुंसांच द्विषतां वर्च आददे "

ज्याप्रमाणें उदय पावणारा सूर्य नक्षत्रांचें तेज नाहीसें करतो त्याप्रमाणें कलह स्त्रीपुरुषांचें तेज नाहींसें करतो. कलह किंवा कलि स्त्रीपुरुषांच्या संसारामध्यें कधींहि प्रविष्ट होऊं नये, याकरितां त्यांनीं परस्परांशीं प्रेमाची वागणूक ठेवावी. बीभत्स भाषण, दुष्ट व्यवहार, विषयासक्ति यापासून अलिप्त राहावें. इंद्रियें व मन यांना स्वाधीन ठेवून कर्तव्यनिष्ठेनें आपली जबाबदारी पार पाडावी. त्यापासून परस्परांमध्यें प्रेम राहून संसारयात्रा सुखकर होईल.

" कर्तव्य जोंवरी चुकू न करावयास ।।
संबंध तो सुखद होय परस्परांस ।।
कर्तव्य जें परि जगीं न कधीं उदात्त ।।
प्रीतीस जागृत करील परस्परांत ।। " —केशवसुत.

विवाहामध्यें काय जादू असेल ती असो; त्यांत जादू आहे असें कोणाला वाटत नाहीं, पण सहजरीतीनें त्याविषयीं सर्वांना मोह उत्पन्न होतो. संन्यास घेऊन किंवा इतर रीतीनें वैराग्य येऊन ज्यांनीं संसाराचा त्याग केलेला असतो त्यांना विवाहाचें महत्व वाटलें नाहीं तरी इतरेजनांना विवाहांत परम सौख्य आहे असेच वाटत असतें व हें सौख्य आपणांस मिळावें अशी त्यांची इच्छा असते.

मनुष्यानें विवाहापूर्वी जे व्यवसाय किंवा जीं कृत्यें केलेलीं असतात त्या सर्वांपासून त्याला आनंदच झाला असेल असें नाहीं; कित्येक कृत्यांमुळें

त्याला विषाद सुद्धां वाटला असेल. पण त्याचा विवाह झाल्य वर त्याला भेटणारा सहचर निरंतर प्रेम करणारा व आयुष्यांतील सर्व अवस्थांत सन्निध राहून साहाय्य करणारा असेल तर त्याचीं पूर्वीचीं उद्वेगजनक कृत्यें त्याच्या आठवणींतून जातील. मग त्या कृत्यांबद्दल त्याला विषाद तो कसा वाटणार ? प्रेमळ सहचराच्या सहवासांत आनंदानें काळ जात असतां पूर्वीच्या उद्वेगकारक गोष्टींचा विषाद न वाटणें ही गोष्ट स्वाभाविकच आहे. वाचाळ व उथळ प्रेमाच्या खळखळाटांतून वर उचलून मूक व गंभीर प्रेमाच्या जीवनांत आणून सोडणारा स्त्रीपुरुषांचा विवाह हा खरा शुभदायक आहे—तोच खरा सौख्यदायकहि आहे. विवाहवेलीवर प्रेमाचें जलसिंचन झालें असतां सौख्याचीं फुलें दिसूं लागतात. या दृष्टीनें विचार करतां कोणालाहि हें सहज समजून येईल कीं, बालविवाहापेक्षां प्रौढ विवाहापासूनच सौख्यलाभ अधिक खात्रीलायकरीतीनें होणार आहे.

विवाहाची जबाबदारी ज्यानें एकदां शिरावर घतली त्यानें ती पूर्ण केलीच पाहिजे, त्या खेरीज त्याला मुक्ति नाहीं. संसारिक व्याधींनीं त्रासून आत्महत्या करण्याचें त्यानें मनांत आणलें तर त्यांत त्याच्या मनाचा कमकुवतपणा मात्र दिसून येईल. संसारासंबंधीं जबाबदारींतून मुक्त होण्याचा तो कांहीं खरा मार्ग नाहीं, असें त्याचें स्वतःचें मन सुद्धां त्याच्याच संकल्पाविरुद्ध साक्ष देईल. रस्किन या ग्रंथकारानें म्हटलें आहे:—

" The shortness of life should not be to any rational person a conclusive reason for wasting the space of it which may be granted him."

" आयुर्मर्यादेची रेखा पुसून टाकण्यास प्रवृत्त होण्याला विचारी माणसांना आयुष्याचें क्षणभंगुरत्व हेंच एक अखेरचें कारण असूं नये. " कांहीं केलें तरी आयुष्य हें अशाश्वत आहे. क्षणभंगुर आहे; म्हणून कष्टांत व हालांत दिवस कंठण्यापेक्षां मरण पत्करावें असा विचार मनांत येतो. पण तो अगदीं वेडेपणाचा आहे. किंबहुना क्षुद्र बुद्धीचा आहे. आपण मेल्यावर दुनिया बुडाली तरी त्याची फिकीर नाहीं अशा बुद्धीनें ज्या विचाराची अंतःकरणांत प्रेरणा होते ती बुद्धि, तो विचार आणि तें अंतःकरणसुद्धां क्षुद्र नाहीं असें कोण म्हणेल !

२८५८(२१)

विवाहामध्यें जी रहस्यमय जादू आहे त्यामुळें ज्यांचे मस्तिष्कतंतू थोडे ढिले असतात व जे अस्थिरबुद्धीचे असतात त्यांच्या डोक्यांतसुद्धां जबाबदारीच्या प्रकाशाचे किरण डोकावूं लागतात. ज्यांच्या हातून पूर्वी कांहींहि चांगलें कृत्य घडलेलें नसतें; जे केवळ चांगलीं कृत्यें करण्यास अगदीं नालायक असेंच ठरलेले असतात; ज्यांचें जीवित असार व निष्फळ असून फुकट चाललें असतें; ज्यांचा मार्ग चुकलेला असतो; जे स्वतःच स्वतःचे शत्रू असतात अशांचा विवाह घडून आला तर ते कदाचित् आपल्याशीं विवाहानें बद्ध झालेल्या सहचराचा मार्ग चुकवितील किंवा आपला मार्ग आपल्या सहचराच्या साहाय्यानें सुधारून घेतील. दोन्हीं गोष्टी शक्य कोटींतील आहेत. कोणती गोष्ट दुसरीहून अधिक शक्य आहे हें विवाहानें बद्ध होणाऱ्या व्यक्तींची ओळख असल्याखेरीज सांगतां यावयाचें नाहीं. एक तर आपल्या सहवानें आपणाशीं विवाहासानें बद्ध झालेल्या जीवांचें कल्याण करतां येतें किंवा आत्मनाशाबरोबर त्या जीवाचाहि सर्वस्वीं नाश करतां येतो. बहुशः पुरुषाच्या अविचारामुळेंच विनाश प्रसंग ओढवत असतो; अशा वेळीं स्त्रीची दूर दृष्टी व विचारशक्ती तो विनाश प्रसंग टाळण्यास अत्यंत उपयोगी पडत असते. जर स्त्रींतसुद्धां दूरदृष्टीचा व विचारशक्तीचा अभाव असेल तर तें मोठें दुर्दैवच समजलें पाहिजे. स्त्रीचा विवाह एखाद्या चांगल्या पुरुषाशीं होवो किंवा वाईट पुरुषाशीं होवो, संसारांत तिचा उपयोग व्हावा असे प्रसंग वारंवार उद्भवतात. विवाहामुळें तिच्या आयुष्याचें क्षेत्र कर्तव्यांनीं भरून जातें, याची जाणीव स्त्रीला झाली पाहिजे. ही जाणीव झाल्यानंतर आपलीं कर्तव्यें पार पाडण्यासाठीं तिनें आपल्या दूरदृष्टीचा व विचारशक्तीचा चांगला उपयोग केला पाहिजे.

गृहस्थाश्रम स्वीकारल्यावर प्रथम योगक्षेमाची चिंता वाहावी लागते. पुरुषानें योग ह्मणजे जरूर असलेल्या वस्तु मिळवून स्त्रीनें त्यांचें रक्षण, व्यय व व्यवस्था करावयाची असते. " अर्थस्य संग्रहे चैनां व्यये चैव नियोजयेत् " धनसंग्रह व व्यय करण्याचे कामीं स्त्रीची योजना करावी अशी मनूनें आज्ञा केली आहे. करितां पुरुषानें स्त्रीवर विश्वास टाकून गृह व्यवस्था पाहण्याचें काम तिजकडे

सोपवावें. संसाराची सर्व जबाबदारी पुरुषानें स्वतःच्या शिरावर घेणें इष्ट नाहीं. ज्या कुटुंबांत संसाराची सर्व जबाबदारी पुरुष वाहतो त्या कुटुंबांतील स्त्री बेजबाबदार राहते. व प्रमाणाबाहेर खर्च होऊन कार्यप्रसंगीं कर्ज काढण्याची त्या कुटुंबावर पाळी येते. कर्जबाजारी होणें आणि धुळीस मिळणें या जवळच्या पायऱ्या आहेत. एकीवरून दुसरीवर जाण्यास मुळींच उशीर लागत नाहीं.

इंग्रजी भाषेंत विवाहित पुरुषाला Husband म्हणतात. हा शब्द Husbandman (शेतकरी) यांतील man याचा संक्षेप होऊन बनला आहे. त्यावरून विवाहित पुरुषाच्या कर्तव्याचा बोध होतो स्वतः धान्य पेरणें किंवा शेतकरीवर्गाच्या मदतीनें धान्यसामुग्री करून ठेवणें हें कार्य पुरुषानें केलें पाहिजे. त्याचप्रमाणें इंग्रजींतील wife हा शब्दसुद्धां स्त्रियांना एका विशिष्ट कर्तव्याची जाणीव करून देणारा आहे. इंग्रजींतील weave धातुपासून wife शब्दाची निष्पत्ति झाली आहे. यावरून म. गांधीना अत्यंत अभिमत असलेला चरखा किंवा सिंगरचीं शिवणाचीं यंत्रें यांच्या साहाय्यानें कापड, कपडे वगैरे करण्याचें काम स्त्रियांनीं केलें पाहिजे जर्मनीमध्यें विवाहित मुलीला सूत काढण्याचा रहाट व तागाचे ढीग आहेरादाखल देण्याची चाल असे. मुलगी जन्माला आल्यापासून तिच्या आईला तिला विवाहाचे वेळीं देण्याकरितां ताग जमविण्याचा उद्योग करावा लागत असे. उत्तरहिंदुस्थानांत देखिल रहाट आंदण देण्याची वहिवाट आहे असें कांहीं दिवसांपूर्वी माझ्या वाचण्यांत आलें होतें.

पुरुषांनीं शेतकी काम करावें व स्त्रियांनीं कोष्ट्याचें किंवा शिंप्याचें काम करावें असें Husband आणि wife या दोन शब्दांच्या मूळ अर्थावरून ध्वनित होतें. अशाप्रकारें पुरुषांनीं किंवा स्त्रियांनीं काम केलें पाहिजे; हें बंधन आजच्या सुधारणेच्या व स्वातंत्र्याच्या काळांत पुष्कळांना मानवणार नाहीं. तरी पण रूढ चालीवरून संसारांतील कार्याची तशाप्रकारची विभागणी झाली होती असें दिसतें. संसारांत कार्यांची विभागणी होऊन स्त्रीपुरुषांवर सारखी जबाबदारी रहावी हें केव्हांहि झालें तरी इष्टच आहे.

प्राचीनकाळीं संसारासंबंधीं आपली जबाबदारी स्त्रिया पार पाडीत असत. तसेंच धर्मसंबंधीं कार्यांतसुद्धां पुरुषांना साहाय्य करण्याची त्यांची तयारी असे. " नास्ति भार्या समो बंधुर्नास्ति भार्या समा गतिः । नास्ति भार्यासमे लोके सहाय्यो धर्मसंग्रहे । "

कालिदासानें स्त्रियांसंबंधीं रघुवंशांत म्हटलें आहे कीं,

" गृहिणि सचीवो मिथः सखा । प्रियशिष्या ललित कलाविधौ " स्त्रिया या कार्यप्रसंगीं मंत्र्याप्रमाणें व मित्राप्रमाणें पुरुषांना साहाय्य करूं शकतात.

भारत वर्षाच्या अवनत काळीं स्त्रियांना त्यांच्या जबाबदारीचा विसर पडत गेला. तेव्हांपासुन त्यांच्या संबंधीं लोकांत गैरविश्वास वाढून द्वेषमूलक कल्पना पसरल्या. पंचतंत्र, हितोपदेश, नीतिशतक वगैरे त्या काळच्या ग्रंथांत स्त्रियांसंबंधीं जीं विधानें केलीं आहेत तीं समाजाच्या अवनत स्थितीची द्योतक आहेत. या स्थितींत बदल करण्याचें धैर्य समाजांत नसल्यामुळें जी रूढी बनली ती अद्यापपावेतों समाजांत चालू आहे. तिचें दास्यत्व जसें पुरुषांनीं स्वीकारीलें तसेंच तें स्त्रियांनींहि पत्करलें. अलिकडे शिक्षणामुळें पुरुषांना हें दास्यत्व झुगारून द्यावेंसें वाटतें. तसेंच स्त्रियांनाहि शिक्षण मिळूं लागल्यास वाटूं लागेल. सध्यां स्त्रियांचे विचार रूढीनें आंखून दिलेल्या मर्यादे-पलिकडे जात नाहींत; व पुरुषांना घरांतील स्त्रियांच्या समजुती दुखविणे इष्ट वाटत नाहीं. परंतु स्त्रीशिक्षणाचा बराच प्रसार झाल्यावर स्त्रियाच पुरुषांना रूढी बाहेर पाऊल टाकण्यास भाग पाडतील.

स्वभावतःच पुरुषांच्या अंगीं उत्साह व सामर्थ्य भरपूर असल्यामुळें कोण-त्याहि मार्गानें सुखाचें शिखर गांठणें त्यांना सोपें असतें. पण त्यांचा मार्ग चुकला किंवा कोठें पाय घसरला तर कडेलोट होऊन सुखाच्या शिखराऐवजीं दुःखाचा तळच त्यांना दिसावयाचा; आणि बहुशः असेंच प्रसंग घडून येतात. याचें कारण पुरुषांना आपला मार्ग आक्रमिण्यांत स्त्रियांचें व्हावें तसें साहाय्य होत नाहीं. तथापि यांत स्त्रियांना सर्वस्वी दोषी धरतां येत नाहीं. पुरुषांनीं आपल्या सत्तेच्या जोरावर स्त्रियांना उपभोग्य वस्तू ठरवून त्यांजकडे कस-

लीहि जबाबदारी ठेवली नाहीं. स्वैरवर्तनासाठीं असें आत्मघातकी कृत्य पुरुषांनीं स्वतांच केलें. सध्यां स्त्रियांना शिक्षण मिळू लागलें आहे. कांहीं काळानें त्यांना आपल्या जबाबदारीची जाणीव होईल. " Nature made thee to temper man" असें Otway कवीनें स्त्रीसंबंधीं म्हटलें आहे. पुरुषाच्या स्वभावांतील कठोरपणा काढून त्याचे ठायीं नम्रपणा आणण्यास व त्यानें संपादन केलेल्या ज्ञानाचा लोकांस उपयोग व्हावयास स्त्रीचे नाजूक हस्तकौशल्याची जरूरी असते. पुरुषामध्यें पशुप्रमाणें ज्या वासना असतात त्यांवर नांगर ओढून सद्गुणांचें बीजारोपण करणें व त्याला मनुष्यपणांत आणणें; तसेंच आपल्या सहवासानें त्याला पूर्ण मनुष्य बनविणें हें कार्य स्त्रीचें आहे तें करण्याचें सामर्थ्य अंगीं आलें असतां स्त्रीला आत्मघातकी पुरुषाचें कल्याण करतां येणार आहे. यांत तिचेंहि पर्यायानें कल्याणच होणार आहे. विवाह संबंधानें स्त्रिपुरुषांचा आत्मा एक होऊन त्यांच्या हिताकरितां स्त्रीनें किंवा पुरुषानें यत्न केला तरी त्यामुळें दोघांचीहि आत्मोन्नति होते. मालती–माधवांत कामंदकीनें नायकनायिकेला जो उपदेश केला आहे तो याच दृष्टीनें महत्वाचा आहे.

" प्रेयो मित्रं बंधुता वा समग्रा ।
सर्वे कामाः शेवधिर्जीवितंवा
स्त्रीणां भर्ता धर्मदाराश्चपुंसां ॥
इत्यन्योन्य वत्सयोर्ज्ञातमस्तु ॥ "

स्मृतिकारांनीं गृहस्थाश्रमांत आचरावयाचे पंचयज्ञ सांगितलें आहेत. त्यांत प्रथम विद्याभ्यास सांगितला आहे. ब्रह्मचर्याश्रमांत विद्यापारंगत झा[illegible] पुनः गृहस्थाश्रमांत सुद्धां विद्याभ्यास करावयास सांगितला आहे. हें विद्[illegible] महत्वच एक परीनें वर्णन केलें आहे. विद्या कितीहि पढून झाली तरी अपु[illegible] राहणार. विद्येचा व्यासंग मनुष्याला राहिल्यानें त्याचें मन सदैव सुसं[illegible] राहून भलतीकडे वळणार नाहीं. " सतां हि संदेहपदेषु वस्तुषु प्रमाणमन्तःकरण प्रवृत्तयः "—जेथें कांहीं संशय उत्पन्न होईल त्या ठिकाणीं सज्जनांच्या

मनाची प्रवृत्ति प्रमाणभूत होय—असें जें कालिदासानें शाकुंतलामध्यें म्हटलें आहे तें विद्याव्यासंगी माणसाच्या अंतःकरणासंबंधीं होय.

दुसरा यज्ञ ईश्वरोपासना होय. विवाहित स्त्री व पुरुष एकोप्यानें व प्रेमानें वागत असले आणि परस्परांच्या सुखाकरितां निस्वार्थबुद्धीनें यत्न करीत असले तरी त्यांना संसारांत कधीं कधीं दुःखाचे प्रसंग येतात. संसार हा केवळ सुखमय नाहीं साधारणपणें संसार सुखपर किंवा दुःखपर होणें हें मनावर अवलंबून असतें. जर मन संसारांतच गुंतून राहिलें, सुखांत सुखलोलुप व दुःखांत दुःखमग्न अशा स्थितींत जर मन सर्वकाळ राहूं लागलें तर संसारांत दुःख अधिक होईल. पण तेंच मन सुखांत अथवा दुःखांत ईश्वराविषयीं भावना जागृत ठेवील तर सुख, किंवा दुःख यांपासून उद्भवणाऱ्या अनुकूल प्रतिकूल भावनांच्या विषमावस्थेंतून निघून शांतीच्या—समतेच्या—अवस्थेत निरंतर राहील. विवाहित आयुष्यक्रम शांतीच्या परम सौख्यांत जाणें हें प्रत्येकाला इष्ट असतें. पण त्या संबंधीं ईश्वरोपासनेच्या जबाबदारीची थोड्याच लोकांना जाणीव असते.

तिसरा यज्ञ पितृतर्पण हा आहे. तर्पण 'या शब्दामध्यें " तृप–तृप्तकरणें' हा धातु आहे. श्राद्धक्रियो करून पितरांना पिंडदान करणें, ते हयात असतांना त्यांना आवश्यक असणाऱ्या अथवा आवडणाऱ्या वस्तू ब्राह्मणांना दान करणें याप्रमाणें हल्लीं तर्पण होत असतें. हा जो तिसरा यज्ञ त्याचा वास्तविक अर्थ लक्षांत घेतां हल्लीं तत्संबंधीं होत असलेले प्रकार बरेच हास्यास्पद वाटतात. खरोखर पाहूं जातां मृतपितरांविषयीं आदर व अभिमान बाळगून त्यांना संतोष वाटेल अशीं कृत्यें करणें हेंच खरें पितृतर्पण होय. स्वाभिमानशून्य व कर्तव्यशून्य राहून पूर्वजांविषयीं बढाई मारण्यानें पूर्वजांचें तर्पण मुळींच होत नाहीं, ही गोष्ट येथें लक्षांत ठेविली पाहिजे. पूर्वजांनीं जी मर्दुमकी व कार्यकौशल्य दाखविलें त्याचा मोठेपणा आपणांस नाहीं. आपल्या कर्तबगारीनें आपण पूर्वजांपेक्षां सवाईनें मोठें होणें हेंच पितृऋण आपणास फेडावयाचें आहे. तें फेडलें तर पितृतर्पण होईल—पितरांची तृप्ति होईल.

भूतबलि हा चवथा यज्ञ. सर्व प्राणिमात्रासंबंधीं दयार्द्र बुद्धि ठेवणें हा त्यांतील मुख्य उद्देश होय.

परोपकार हा पांचवा यज्ञ होय. या संबंधीं पूर्वीं थोडें विवेचन केलेंच आहे. पुनरुक्तीच्या दोषास पात्र न होतां तत्संबंधीं येथें सांगावयाचें म्हटलें म्हणजे गृहस्थाश्रमांत कांहीं वर्षें घालविल्या नंतरचा जो आश्रम हिंदुधर्मशास्त्रानें सांगितला आहे तो परोपकाराचा होय. वानप्रस्थाश्रम हेंच त्याचें नांव होय. संसारासंबंधीं जबाबदारींतून मुक्त होऊन या आश्रमांत लोकसेवेचें व्रत स्वीकारावयाचें असतें. या आश्रमांत पुरुषाची किंवा स्त्रीची विवाहितावस्था लोकसेवेच्या आड येऊ शकत नाहीं. कारण संसारासंबंधीं जबाबदारी गृहस्थाश्रमांत नवीनच प्रवेश करणाऱ्या मुलांमुलींवर या वेळीं टाकतां येणें शक्य असतें. राष्ट्रकार्यासंबंधीं अधिक जबाबदारी गृहस्थाश्रमानंतर लागलीच स्त्रीपुरुषांवर येत असते. ही जबाबदारी पार पाडणें देशसेवा करणें–हें परोपकाराचें कार्य आहे. तो पांचवा यज्ञ आहे. विवाहितांवर विवाहानें येणारी ती अत्यंत मोठी जबाबदारी आहे.

राष्ट्रकार्य अबाधित आणि सतत पुढें चालावें याकरितां तसें शिक्षण आपल्या संततीला देणें हें विवाहितांचें एक मोठें जबाबदारीचें कार्य आहे आपल्या संततीनें आपला संसारभार हलका करून पुढें आपल्याप्रमाणेंच राष्ट्रकार्य चालवावें म्हणून त्या संततीला जें शिक्षण द्यावयाचें तें काळजीपूर्वक दिलें पाहिजे. मुलांना जरी एखाद्या राष्ट्रीय शाळेंत ठेविलें तरी त्यामुळें ती राष्ट्रकार्य करण्यास समर्थ होतीलच असें नाहीं. मुलाच्या शिक्षणाकडे प्रथम मातेचें लक्ष असलें पाहिजे. गृहिणींची जीं कर्तव्यें आहेत त्यांत गृहशिक्षणासंबंधीं, मुलांच्या आरोग्यासंबंधीं वगैरे कर्तव्यें महत्वाचीं आहेत. त्यांचा संबंध राष्ट्रीय घटनेशीं पोंचतो. याच कारणाकरितां स्त्रियांना पुरुषांहून शिक्षणाची अधिक आवश्यकता आहे. राष्ट्राचें कल्याण व उद्धार करण्याची जबाबदारी पाळण्याची दोरी हातीं धरणाऱ्या स्त्रियांची आहे.

मुलांना व्यवहारोपयोगी शिक्षण देऊन स्वावलंबी बनविणें हे पित्याचे कर्तव्य आहे. आपला संसारभार हलका व्हावा म्हणून मुलाला त्यांचे शिक्षण

[stamp]

पुरें झालें नाहीं तोंच विवाहपाशांत अडकविणें म्हणजे त्याला एकप्रकारें परावलंबी करणें होय. शिक्षणाला स्वतंत्रता आणि एकाग्रता या दोन गोष्टी आवश्यक असतात. त्या आपल्या मुलांकडून हिरावून घेणारे आईबाप त्यांचे मोठें नुकसान करतात.

ज्या कुटुंबांतील सर्व माणसें सुशिक्षित असतात त्याच कुटुंबाच्या वसतिस्थानाला आश्रम असे नांव अन्वर्थक होईल. तोच गृहस्थाश्रम धन्य होय. गृहव्यवस्था उत्तम राहून संततीस राष्ट्राच्या हिताला पोषक असें शिक्षण मिळावें या करितां विवाहित स्त्रीपुरुषांनी सुशिक्षित असलें पाहिजे. विवाहाची जबाबदारी शिरावर घेण्यापूर्वी जर स्त्रीपुरुष सुशिक्षित नसतील तर त्यांजकडून आपली जबाबदारी योग्यप्रकारें पाळली जाणार नाहीं. सुशिक्षित पुरुष आणि अशिक्षित स्त्री यांचा विवाह झाला तर त्यांचा प्रपंच वाढतो, म्हणजे मुलेंबाळें सृष्टिक्रमानुसार होतात पण त्यांची स्वतःची प्रगति होत नाहीं. आत्मोन्नति हा जो विवाहाचा मुख्य हेतु तो सुशिक्षित पुरुष आणि अशिक्षित स्त्री अशाप्रकारच्या विजोड दांपत्यामुळें सिद्धीस जात नाहीं. खरें दांपत्यसुख विजोड दांपत्याच्या वांट्यास फार करून येत नाहीं म्हणून स्त्रीनें व पुरुषानें स्वतः सुशिक्षित होऊन सुशिक्षित वराची व सुशिक्षित वधूची निवड करावी.

संसारांत लागणाऱ्या गोष्टींची तरतूद करून स्त्रीपुरुषांनीं शास्त्र, कला, वाङ्मय इ. गोष्टींकडे जरूर लक्ष दिलें पाहिजे. असें झालें तरच संसार हा निव्वळ भार व क्लेशकारक न वाटतां त्यांत पुष्कळ सुख असल्याचें आढळून येईल. "Intellectual Life" या ग्रंथांतील खालीं दिलेल्या उताऱ्यावरून विवाहित स्त्रीपुरुष सुशिक्षित असणें किती अगत्याचें आहे हें कळून येईल:—

"Besides providing for families and enjoying their society, people are meant to know, to act, to feel, to know, everything which the mind is able to contemplate, name and to classify; to do everything, which the will, prompted by the passion and guided by

the conscience can undertake and subject to the same guidance, to feel its utmost vigour every emotion which contemplation of various persons and objects which surround us, can excite. This view of objects of life affords an almost infinite scope for human activity in different directions."

" घरांतील माणसांची तरतूद करणें व त्यांच्या सहवासांत आनंदानें काळ घालविणें याखेरीज इतर पुष्कळ गोष्टी लोकांनीं करावयाच्या असतात. त्यांनीं ज्ञान, कर्म आणि भाव-भक्ति-या तीन मार्गांत आपलें पाऊल जितकें पुढें टाकतां येईल तितकें तें टाकण्याचा यत्न केला पाहिजे. ज्ञानाचा जेवढा प्रांत काबीज करतां येईल तेवढा त्यानीं मनानें-विचार सामर्थ्यानें-काबीज करून त्याची नीटपणें पाहणी, नोंदणी व विभागणी केली पाहिजे. सद्भावनेच्या टोंचणीनें कार्यसन्मुख होणाऱ्या इच्छेला सदसद्विवेकबुद्धीच्या लगामीं लावून जीं कार्यें करतां येण्यासारखीं असतील तीं सर्व त्यांनीं केलीं पाहिजेत. आणि विवेकबुद्धीच्या लगामीं असतांनाच सभोंवती वावरणाऱ्या भूतमात्रांच्या व वस्तूंच्या निरीक्षणानें मननानें-आपल्या मानससरोवरावर उसळणाऱ्या विकारतरंगाशीं व उत्साहलहरींशीं भक्तियुक्त अंतःकरणानें त्यांनीं तद्रूप झालें पाहिजे. अशा सहानुभूतीच्या-प्रेमाच्या-भक्तीच्या दृष्टीनें त्यांनीं सर्व प्राणीमात्रासंबंधीं विचार केल्यास निरनिराळ्या दिशेनें सत्कार्य लोकसेवेचें कार्य करतां येईल इतकें मोठें कार्यक्षेत्र आपणांपुढें आहे असें त्यांना कळून येईल. "

आर्यावर्तांत प्राचीन काळीं वधुवरें सुशिक्षित असत याबद्दल अनेक ऐतिहासिक दाखले उपलब्ध आहेत. बृहदारण्यकोपनिषदांत याज्ञवल्क्य व मैत्रेयी या पतिपत्नींचा गहन विषयावर संवाद आहे. पाश्चात्य देशांत असे अनेक विद्वान पुरुष होऊन गेले कीं, त्यांचें ग्रंथावलोकन, लेखन वगैरे व्यवसाय त्यांच्या स्त्रियांच्या सान्निध्यांत व साहाय्यानें होत. असे अशा प्रकारची एकच गोष्ट सांगून हा बराच लांबलेला लेख आटोपता घेतों.

युरोपमध्यें मागें सर्वराष्ट्रीय परिषद झाली. ती जेथें भरली होती, त्या जिनोवा शहरी ह्यूबर नांवाचा एक मोठा शास्त्रज्ञ होऊन गेला. तो वयाच्या १७ व्या वर्षी दोन्ही डोळ्यानीं अंधळा झाला. त्याचा विवाह एका कुलीन घराण्यांतील सुशिक्षित स्त्रीशीं झाला होता. त्याजबरोबर विवाह करणारी ही स्त्री महाभारतांतील गांधारीप्रमाणें मोठी अलौकिक होती. ती आपल्या दृष्टिहीन पतीला कधींहि दुःख होऊं नये म्हणून अहर्निश झटत असे; त्यास शास्त्राचा पुढें अभ्यास करण्यासाठीं ती उत्तेजन देई. शास्त्राचा अभ्यास करावयाचा म्हणजे दृष्टि फारच तिक्ष्ण असावी लागते. त्यांतून सृष्टिशास्त्राच्या एका अत्यंत सूक्ष्म भागावर ह्यूबर ह्याला प्रयोग करावयाचे होते. ते सर्व प्रयोग त्यानें आपल्या पत्नीच्या दृष्टीच्या साहाय्यानें केले; व तिजकडून " मक्षिका " या विषयावर अत्युत्तम ग्रंथ लिहविला. स्त्रीला व पुरुषाला परस्परांच्या वाङ्मय वाचनादि व्यवसायांत गम्य असलें म्हणजे त्यांना जसें घरीं सुख मिळेल तसें इतरत्र मिळणार नाहीं.

हल्लीं स्त्रीवर्ग अशिक्षित असल्यामुळें करमणुकीकरितां पुरुष रिक्रिएशन क्लबामध्यें जात असतात. तेथें त्यांची करमणूक होत असली तरी खरें सुख मिळत नाहीं. एवढेंच नव्हे तर कधीं कधीं नकळत ते पुढील दुःखाचा पाया क्लबांतून रचित असतात. सर्वच क्लबांसंबंधीं असें विधान चुकीचें होईल हें खरें, पण साधारणपणें क्लबामध्यें चैनबाजीपणाकडे प्रवृत्ति असणारीं बरींच माणसें असतात ही गोष्ट खोटी नाहीं.

स्त्रियांचें करमणुकीचें स्थान म्हणजे गांवांतील किंवा शहरांतील देवळें. तेथें स्त्रिया भाविकपणानें देवासंबंधीं दोन शब्द ऐकावे म्हणून जात असतात. हे दोन शब्द सांगणारे हरिदास किंवा पुराणिक कोणत्या योग्यतेचे असतात हें कळण्याला स्त्रियांना त्यांच्या अशिक्षितपणामुळें मार्ग नसतो. बहुतेक हरिदास व पुराणिक केवळ उदरंभरू असून अशिक्षित जनांच्या अज्ञानाचा फायदा घेणार असतात. आत्मोन्नतीचा मार्ग दाखविण्यास त्यांच्या इतके नालायक गुरू कोठेंच मिळणार नाहीत. एवंच विवाहाचें—सर्व आयुष्याचें—ध्येय जे आत्मो-

न्नति त्यांच्या आड अशिक्षितपणा–अज्ञान–येत असतें. तें काढून टाकण्याचा सर्वांनीं यत्न करावा.

आपल्या देशांत सुशिक्षितांचें प्रमाण वाढत आहे. कांहीं स्त्रियाहि चांगल्या सुशिक्षित झाल्या आहेत. लोकसंख्येच्या मानानें आतांपर्यंत झालेला शिक्षणप्रसार थोडासा वाटतो, तरी त्यांत निराशा वाटण्याचें कारण नाहीं. सुशिक्षित पुरुषांच्या मानानें सुशिक्षित स्त्रियांची संख्या अल्प आहे, ह्मणून सुशिक्षित वरांना अशिक्षित वधूंशीं विवाह करण्याचा प्रसंग येतो. ज्या वेळीं पुष्कळ स्त्रिया सुशिक्षित होतील त्या वेळीं सुशिक्षित वरांनीं अशिक्षित वधूंशीं विवाह करणें अशक्य होईल. ही स्थिति आपल्या देशांत लवकर यावी व देशांतील अज्ञान नाहींसें व्हावें अशी सदिच्छा प्रगट करून हा लेख पुरा करतों.

'नहि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते '। भ. गी.

... ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. २४६४
... ठाणे
REFBK-0002464

समाप्त.